महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २६४७४२११

क्र. मासं/वेवदे/२७०००
प्रकाशगड,४ था मजला,
प्रा.अनंत काणेकर मार्ग,वांद्रा(पूर्व),
मुंबई ४०० ०५१
email : msedclsalary@gmail.com
website : www.msedclsalary@gmail.in
दिनांक : १५/११/२०१८

# परिपत्रक

विषय :- महत्वाच्या सणासाठी अग्रिम देण्याबाबत.

******

सर्वसामान्य आदेश क्र.२६७ दि.१२.१०.१९५७ अन्वये म.रा.वि.वि.कंपनीतील कर्मचाऱ्यांना शासकीय नियमानुसार महत्वाच्या सणांसाठी अग्रिम रक्कम देण्यात येते.

२. परिपत्रक क्र. साप्रवि/वेतन व देयके/सण अग्रिम/४०४४४ दि.३०.११.२०१५ अन्वये, ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन रु.१७,६१५/-पेक्षा अधिक नसेल अशा कर्मचाऱ्यांना रु.१०,०००/- इतकी सण अग्रिम रक्कम देय आहे. तथापि, आता महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अग्रिम-२०१८/ प्र.क्र.३७/१८/विनियम दि.२३ ऑक्टोबर २०१८ अन्वये, सण अग्रिमासाठी मर्यादा सुधारीत करण्यात आली आहे.

३. प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वाणिज्य), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन महावितरण कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन रु.१७,६१५/- (रुपये सतरा हजार सहाशे पंधरा फक्त) पेक्षा जास्त नसेल अशा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सण अग्रिम रु.१२,५००/- देण्यास मान्यता दिली आहे.

४. सण अग्रिम फक्त पुढील सणांना तसेच शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठी अनुज्ञेय राहील.

१) दिवाळी
२) रमझान ईद
३) ख्रिसमस
४) पारसी नववर्ष
५) संवत्सरी
६) रोश होशना
७) वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती)
८) स्वातंत्रदिन
९) प्रजासत्ताक दिन
१०) डॉ.आंबेडकर जयंती

५. सदर परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येईल. तसेच सण अग्रिम मंजूर करण्यासंबधीच्या इतर अटी व शर्ती पूर्वी विहित केल्याप्रमाणे राहतील.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( भूषण कुलकर्णी )
महाव्यवस्थापक (मासं)

**सण अग्रिम मर्यादा वाढविणेबाबत.**

महाराष्ट्र शासन

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः अग्रिम-२०१८/प्र.क्र.३७/१८/ विनियम**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: २३ ऑक्टोबर,२०१८

<u>वाचा</u> : (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एफएनडी-१०६२-बी, दि.६.१२.१९६२.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.मुंविनि-१०९९/प्र.क्र.५२/९९/विनियम, दि.२०.१०.१९९९.
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०.०५/प्र.क्र.१८/०५/विनियम, दि.२०.०६.२००५.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०.०७/प्र.क्र.५८/०७/विनियम, दि.१९.१०.२००७.
(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०.०८/प्र.क्र.७०/०८/विनियम, दि.१५.५.२००९.
(६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०.०९/प्र.क्र.४८/०९/विनियम, दि.१५.०९.२००९.
(७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१०/प्र.क्र.१२/१०/विनियम, दि.१०.०५.२०१०.
(८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१२/प्र.क्र.३२/१२/विनियम, दि.१८.१०.२०१२.
(९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१५/प्र.क्र.५७/१५/विनियम, दि.२६.१०.२०१५
(१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/१७/विनियम, दि.१८.०५.२०१७

<u>**प्रस्तावना -**</u>

अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम क्र.१४२ (जे) अनुसार देण्यात येणाऱ्या सण अग्रिमाची रक्कम वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> -

शासन आता असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील ज्या अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे ग्रेड वेतन ₹४,८००/-(रु.चार हजार आठशे) पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ₹१२,५००/- (रु.बारा हजार पाचशे फक्त) सण अग्रिम अनुज्ञेय राहील.

२. सण अग्रिम फक्त पुढील सणांना तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठीच अनुज्ञेय राहील.

| | | |
|---|---|---|
| १. दिवाळी | २. रमझान ईद | ३. ख्रिसमस |
| ४. पारसी नववर्ष | ५. संवत्सरी | ६. रोश-होशना |
| ७. वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती) | | ८. स्वातंत्र्य दिन |
| ९. प्रजासत्ताक दिन | १०. डॉ.आंबेडकर जयंती | |

३. सण अग्रिम मंजूरी आणि वसूलीच्या अटी व शर्ती पूर्वी विहित केल्याप्रमाणेच राहतील.

४. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५.	मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम क्रमांक १४२ (जे) मध्ये योग्य ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१०२३१६१८४७९७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

J. J. Valvi

Digitally signed by J. J. Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=816d3fe4c7042f66b4ac73a1f0087cd8fda3e115d42dc8b54c0e783064c80dc1, cn=J. J. Valvi
Date: 2018.10.23 16:22:50 +05'30'

**(ज. जि. वळवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
३. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
४. * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. राज्यपालांचे सचिव
६. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
८. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधान सभा, विधान परिषद व संसद सदस्य
१०. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
११. अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग.
१२. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग
१३. राज्य निवडणूक आयोग.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई
१९. * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
२०. * प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
२१. * प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, ३ रा मजला वर्ल्ड ट्रेड सेंटर जवळ, कफ परेड, मुंबई-४०० ००५

२२. * प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२३. * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२४. * प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई
२५. * प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय, नागपूर / मुंबई, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१
२६. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली .
२७. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती.
२८. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ, स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद / नाशिक/ अमरावती).
२९. सर्व उप कोषागार अधिकारी
३०. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
३१. सर्व विभागीय आयुक्त
३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३३. सर्व जिल्हाधिकारी
३४. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१
३५. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३७. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३८. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१
३९. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
४०. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर,वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई४०० ०२०,
४१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४०० ००४
४२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
४३. इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.
४४. नॅशनिलीस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री पेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.
४५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८,
४६. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, दादर, मुंबई- ४०० ०२८,
४७. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
४८. निवड नस्ती, विनियम, वित्त विभाग.

* पत्राव्दारे.